दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी


### बीएमसीच्या भूमिगत केबलला आग

**मुंबई :** दक्षिण मुंबईतील भेंडी बाजार परिसरात रविवारी उशिरा रात्री भूमिगत बीएससी (BSC) केबलला अचानक आग लागल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. जे. जे. मार्ग पोलीस ठाण्याच्या शेजारी, मटन मार्केटजवळ ही घटना घडली. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, भूमिगत केबलमधून धूर आणि आगीच्या ठिणग्या बाहेर येऊ लागल्यानंतर स्थानिक नागरिकांमध्ये घबराट पसरली. घटनेची माहिती संबंधित यंत्रणांना देण्यात आली. मात्र, सुमारे अर्धा ते पाऊण तास कोणतीही आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी पोहोचली नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.


**पाहिजेत**

श्री VARAD CONSTRUCTION

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.

कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.



छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. २९ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ७० ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## थोडक्यात वार्ता

### मुंबईकरांच्या तलावांतील साठा 7.08 टक्क्यांवर

**मुंबई :** मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात प्रमुख तलावांतील पाणीसाठा अद्याप चिंताजनक स्थितीत असून शहरासमोरील पाणीपुरवठ्याचे आव्हान कायम आहे. जल अभियांत्रिकी विभागाच्या मास्टर कंट्रोल सेंटरने दिलेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळपर्यंत सर्व तलावांमध्ये मिळून केवळ ७.०८ टक्के वापरण्यायोग्य पाणीसाठा उपलब्ध आहे. सध्या एकूण १,०२,४६० दशलक्ष लिटर पाणी उपलब्ध असून तलावांची एकूण साठवण क्षमता १४,४७,३६३ दशलक्ष लिटर आहे. अप्पर वैतरणा तलावाची परिस्थिती सर्वाधिक गंभीर आहे. या तलावाची पातळी लोअर डेड लेव्हलच्या खाली गेल्यामुळे त्यामध्ये वापरण्यायोग्य पाणीसाठा शिल्लक नाही. या भागात केवळ ८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मोडक सागरमध्ये काही प्रमाणात सुधारणा दिसून आली आहे. या तलावात १८.५० टक्के वापरण्यायोग्य पाणीसाठा असून परिसरात ६९ मिमी पाऊस झाला. तानसा तलावात १०१ मिमी पाऊस झाला असला तरी तेथे केवळ ०.४१ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. मध्य वैतरणा तलावात ११.३६ टक्के वापरण्यायोग्य पाणी आहे. या परिसरात ७१ मिमी पावसाची नोंद झाली असून २३ जूनपासून येथून नियंत्रित पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे.


### नाशिकमधील हॉटेलमध्ये आढळला तरुणाचा मृतदेह


नाशिक : नाशिक शहरातील वडाळा नाका परिसरातील नामांकित हॉटेलमध्ये एका तरुणाचा मृतदेह आढळून आला. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. रविवारी दुपारी तरुणाचा मृतदेह आढळून आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या घटनेमुळे हॉटेल परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, अजित पठाण असं मृत तरुणाचे नाव होते. मृत अजित पठाण हे मूळ मुंबईतील वांद्रा येथील रहिवासी असून, सध्या जुने नाशिक येथील बावनपुरा परिसरात वास्तव्यास होते. अजित पठाण हे आपल्या दोन मित्रांसह हॉटेलमध्ये मुक्कामासाठी आले होते. रविवारी सकाळी त्यांचे दोन्ही मित्र नाश्त्यासाठी खाली गेले असता अजित पठाण हे रूममध्येच थांबले होते. नाश्ता करून परत आल्यानंतर रूमचा दरवाजा आतून बंद असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अनेकदा आवाज देऊनही कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने मित्रांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला. त्यावेळी अजित पठाण हे रूममध्ये मृतावस्थेत आढळून आले.

### समृद्धी महामार्गावर भीषण अपघात ; 5 जणांचा दुर्दैवी मृत्यू

अमरावती : समृद्धी महामार्गावरील अपघातांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. महामार्ग जेवढा सोईस्कर आणि सुखकर आहे तेवढाच जास्त तो घातक ठरत आहे. गेल्या आठवडाभरात विविध जिल्ह्यात झालेल्या अपघातात अनेक प्रवाशांना आपला जीव गमवावा लागला आहे. राज्यातील अपघातांच्या घटना काही केल्या कमी होताना दिसून येत नाही. अशातच आज पुन्हा एकदा समृद्धी महामार्गावर भीषण अपघातझाल्याची दुर्दैवी घटना घडली. या दुर्घटनेत 5 जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे तालुक्यात समृद्धी महामार्गावर एक चार चाकी वॅगनार कार आणि ट्रक यांच्यात मोठी धडक झाली. चंद्रपूरहून मुंबईच्या दिशेने निघालेल्या वॅगनार कारने पुढे जात असलेल्या भरधाव ट्रकला मागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात कारचा अक्षरशः चुरा झाला असून कारमधील सर्व प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. चैनल क्रमांक १०५ जवळ हा भीषण अपघात झाला.

## "खरं की काय"



# दिल्लीचा धडा विसरले छत्रपती संभाजीनगर?

## पार्किंगसाठी मंजूर तळघरांत भरतायत अभ्यासिका, कोचिंग क्लासेस; शेकडो विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर













हिंदू प्रकाशवार्ता | सिद्धेश्वर थोर / नितीन दांडगे

**छत्रपती संभाजीनगर :** दिल्लीतील जुन्या राजेंद्र नगर परिसरातील राव आयएएस स्टडी सर्कलच्या तळघरात २७ जुलै २०२४ रोजी पावसाचे पाणी शिरल्याने तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आणि संपूर्ण देश हादरला. या दुर्घटनेनंतर तळघरांमध्ये सुरू असलेल्या कोचिंग क्लासेस, अभ्यासिका आणि इतर व्यावसायिक वापरावर अनेक राज्यांनी कठोर कारवाई केली. सुरक्षेचे नियम अधिक कडक करण्याचे आदेश देण्यात आले. मात्र जवळपास दोन वर्षांनंतर छत्रपती संभाजीनगरमधील परिस्थिती पाहता एकच प्रश्न उपस्थित होतो दिल्लीचा धडा आपण खरोखर घेतला का?

'हिंदू प्रकाशवार्ता'ने केलेल्या पाहणीत शहरातील







अनेक व्यावसायिक संकुलांच्या तळघरांमध्ये मंजूर आराखड्याच्या विरुद्ध वापर सुरू असल्याचे निदर्शनास आले. पार्किंगसाठी मंजूर असलेल्या जागांमध्ये अभ्यासिका, कोचिंग क्लासेस, ट्युशन, मेस आणि इतर

-> पान 2 वर

### नोटिसा दिल्या..... पण पुढे काय?

**शहरातील तळघरांचा नियमबाह्य वापर रोखण्यासाठी कारवाई सुरू असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात येत आहे. तळघरांमध्ये सुरू असलेल्या अभ्यासिका, कोचिंग क्लासेस आणि तत्सम उपक्रमांना आतापर्यंत १५ ते २० नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच दुकाने, व्यावसायिक आस्थापना आणि इतर अनधिकृत वापर करणाऱ्या २७५ ते ३०० मालमत्ताधारकांनाही नोटिसा देण्यात आल्या आहेत.**

**– अशोक एन. खांडेकर, मुख्य अग्निशमन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर**

# पक्षाशी गद्दारी करणाऱ्यांना त्यांची योग्य जागा दाखवून द्या

## पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचे शिवसैनिकांना जाहीर आवाहन




**परभणी :** जगात जर्मनी आणि भारतात परभणी, या उक्तीप्रमाणे येथील सच्चा शिवसैनिकांनी स्वतःचे रक्त सांडून भगव्याची शान सातत्याने कायम राखली आहे. अनेक पेचप्रसंगांतून शिवसेनेचा हा बालेकिल्ला शिवसैनिकांनी जीवाचे रान करून अबाधित ठेवला आहे. हा मतदारसंघ कायम शिवसेनेच्या पाठीशी उभा राहिला असताना, या जिल्ह्यातून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना गद्दार होण्याची परंपराच लागली आहे. मात्र, आता या गद्दारांना धडा शिकवण्यासाठी शिवसैनिकांना त्यांच्यावर महात्मा फुलेंचा आसूड चालवावा लागेल, असा घणाघात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला आहे. येथील अक्षदा मंगल कार्यालयात आयोजित निष्ठावंतांच्या मेळाव्यात ते बोलत होते. शिवसेनेने शेवटपर्यंत हिंदुत्वाच्या विचारधारेवर कायम राहून जनतेचे प्रश्न सोडवण्यास प्राधान्य दिले आहे, असा पुनरुच्चारही त्यांनी यावेळी केला.

मेळाव्यात बोलताना पक्षप्रमुख ठाकरे यांनी शिवसेनेशी बंडखोरी केलेल्या खासदारांवर कडाडून टीका केली. दोन पत्र्यांच्या घरात राहणाऱ्या साध्या कार्यकर्त्यांना शिवसेनेने पदे देऊन हजारो कोटींचा मालक बनवले, मात्र त्यांना केवळ स्वतःचा स्वार्थ जडला आहे. येथील सच्चे शिवसैनिक आणि मायबाप जनता या गद्दारांना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भाजपच्या राजकीय नीतीवर सडकून टीका करताना ते म्हणाले की, अंतर्गत गटबाजी ही शिवसेनेत नसून भाजपामध्ये मोठ्या प्रमाणात सुरू आहे. देवेंद्र फडणवीस हे भविष्यात पंतप्रधानपदाचे दावेदार होऊ नयेत, यासाठीच भाजपमधून त्यांची पंख छाटण्याची प्रक्रिया सुरू आहे. बंडखोर खासदारांनी केलेला गट घटनात्मकदृष्ट्या योग्य नसून, लोकसभा अध्यक्षांनी यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

उद्धव ठाकरे यांनी पुढे बोलताना बंडखोर खासदारांनी बाळासाहेबांच्या विचारांशी घात केल्याचा आरोप केला. मागील निवडणुकीत ज्यांच्यावर मोठा विश्वास टाकला, ते स्वतःला वाघ समजणारे लोक केवळ वाघाचे कातडे पांघरलेले लांडगे निघाले आणि पळून गेले, असा टोला त्यांनी लगावला. जनतेच्या विकासाच्या नावाखाली स्वतःच्या खाजगी स्वार्थासाठी विचारांशी गद्दारी करणारे हे लोक खाजगी विमानांच्या दलालांसोबत फिरत आहेत, ते जनतेचा काय विचार करणार, असा सवाल त्यांनी केला. राज्यात शेतकऱ्यांचे अनेक गंभीर प्रश्न प्रलंबित असताना, अद्यापही पीक विमा मिळालेला नाही. हे सरकार आर्थिकदृष्ट्या कंगाल झाले असून राज्याची आर्थिक स्थिती पूर्णपणे मोडकळीस आली आहे, अशी टीका त्यांनी सरकारवर केली. रामाच्या नावावर मते मागून दुकानदारी चालवणारी मंडळी आता भ्रष्टाचार करून बाबरांची पार्टी झाली आहे, अशी घणाघाती टीका त्यांनी भाजपवर केली.

या मेळाव्यात शिवसेना नेते संजय राऊत यांनीही बंडखोरांवर जोरदार हल्ला चढवला. अनेक आले आणि गेले, मात्र शिवसेनेला काही फरक पडत नाही, असे सांगत आता 'ऑपरेशन प्रभू श्रीराम' सुरू झाले असल्याचे त्यांनी घोषित केले. कोट्यवधी रुपये हस्तगत करून गद्दारी करणाऱ्यांना दिसताच तुडवा, यासाठी कोणत्याही आदेशाची वाट पाहू नका, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. आमदार डॉ. राहुल पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकात खासदारांवर कडाडून टीका करत, कार्यकर्त्यांच्या अंगावर येणाऱ्यांना शिंगावर घेण्याचा सज्जड दम दिला. या मेळाव्याला युवा नेते आदित्य ठाकरे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, अनिल देसाई, विनायक राऊत, अंबादास दानवे यांच्यासह अनेक आजी-माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अजिंठा घाटाला पर्यायी ठरणारा मुख्य मार्ग दुरुस्तीच्या प्रतीक्षेत

## सावरखेडा-लेनापूर-दत्तवाडी-डकला पांढरी रस्त्याची दुरवस्था

हिंदू प्रकाशवार्ता । शेख हक्कानी

**फर्दापूर :** सिल्लोड-सोयगाव विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागाला जोडणारा जुना सावरखेडा-लेनापूर-दत्तवाडी-डकला पांढरी हा महत्त्वाचा मुख्य रस्ता सध्या अत्यंत दयनीय अवस्थेत असून, या रस्त्याच्या तातडीने दुरुस्तीची मागणी परिसरातील ग्रामस्थांकडून होत आहे. डांबरीकरण पूर्णपणे उखडून निघाल्याने रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे.

हा रस्ता सावरखेडा, लेनापूर, दत्तवाडी, डकला पांढरी तसेच परिसरातील अनेक गावांना घाटनांद्रा व सिल्लोड शहराशी जोडणारा महत्त्वाचा दुवा मानला जातो. दैनंदिन प्रवासासाठी विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी व नागरिक मोठ्या प्रमाणावर या मार्गाचा वापर करतात. मात्र गेल्या काही वर्षांपासून रस्त्याची दुरवस्था वाढत असून, संबंधित विभागाकडून अद्याप कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नाही.

विशेष म्हणजे, अजिंठा घाटात अपघात, दरड कोसळणे किंवा वाहतूक कोंडी निर्माण झाल्यास हा मार्ग पर्यायी रस्ता म्हणून अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो. घाटातील वाहतूक विस्कळीत झाल्यानंतर अनेक लहान-मोठी वाहने या मार्गाचा वापर करतात. त्यामुळे हा रस्ता केवळ काही गावांचा अंतर्गत मार्ग नसून संपूर्ण परिसराच्या वाहतूक व्यवस्थेसाठी जीवनवाहिनी ठरत आहे.

सध्या रस्त्यावरील डांबर पूर्णपणे निघून गेल्याने खडी उघडी पडली आहे. परिणामी दुचाकीस्वारांना मोठा त्रास सहन करावा लागत असून लहान-मोठ्या अपघातांच्या घटनाही वाढत आहेत. पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचत असल्याने खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे शाळकरी विद्यार्थी, रुग्णवाहिका, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत आहेत.

याबाबत भारतीय जनता पक्षाच्या अल्पसंख्याक मोर्चाचे जिल्हा चिटणीस शेख परवेज यांनी सांगितले की, "हा रस्ता केवळ चार-पाच गावांचा अंतर्गत रस्ता नसून सिल्लोड-सोयगाव मतदारसंघातील वाहतूक सुरळीत ठेवणारा महत्त्वाचा मार्ग आहे. अजिंठा घाटातील वाहतूक बंद झाल्यास हा रस्ता पर्यायी व्यवस्था म्हणून काम करतो. त्यामुळे प्रशासनाने व संबंधित विभागाने कोणताही विलंब न लावता या रस्त्याच्या दुरुस्ती व डांबरीकरणासाठी निधी मंजूर करावा."

दरम्यान, सावरखेडा, लेनापूर, दत्तवाडी आणि डकला पांढरी येथील ग्रामस्थांनी या रस्त्याच्या प्रश्नाकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष देऊन मंत्रालय स्तरावर पाठपुरावा करावा, अशी मागणी केली आहे. नागरिकांना सुरक्षित, खड्डेमुक्त आणि दर्जेदार रस्ता उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचेही ग्रामस्थांनी नमूद केले.

### घाट बंद झाल्यास हाच ठरतो पर्यायी मार्ग

**अजिंठा घाटात अपघात, दरड कोसळणे अथवा वाहतूक कोंडी झाल्यास सावरखेडा-लेनापूर-दत्तवाडी-डकला पांढरी हा मार्ग वाहनांसाठी महत्त्वाचा पर्याय ठरतो. मात्र या रस्त्याचीच दुरवस्था झाल्याने पर्यायी वाहतुकीसमोरही मोठे आव्हान निर्माण झाले आहे.**

# विषारी कॅप्सूल वाटप प्रकरणात सायको किलरचा मास्टरप्लॅन; AI ला विचारले नको ते प्रश्न

**मुंबई:** मुंबईतील मोहरम मिरवणुकीदरम्यान विषारी कॅप्सूल वाटप करण्याच्या संशयित कटाचा मुंबई पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात फैयाज निसार हुसेन प्रेमजी नावाच्या आरोपीला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून १४,९०० संशयित विषारी कॅप्सूल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या कारवाईमुळे मोठी दुर्घटना टळल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. तपासानुसार, मिरवणुकीत काही लोकांना या कॅप्सूल्स "व्हिटॅमिन" किंवा "इम्युनिटी बूस्टर" असल्याचे सांगून दिल्या जात होत्या. काही नागरिकांना संशय आल्याने त्यांनी कॅप्सूलची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने तपास सुरू करत आरोपीला ताब्यात घेतले.

पोलिसांच्या प्राथमिक तपासात जप्त केलेल्या कॅप्सूलमध्ये झिंक फॉस्फाईड हे उंदीर मारण्यासाठी वापरले जाणारे विषारी रसायन असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या पदार्थाची अधिकृत फॉरेन्सिक तपासणी सुरू असून अंतिम अहवालाची प्रतीक्षा आहे. या प्रकरणात काही जणांनी कॅप्सूलचे सेवन केल्यामुळे त्यांची प्रकृती बिघडल्याची माहिती समोर आली आहे.

संबंधितांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून काही रुग्णांवर अद्याप उपचार सुरू आहेत. तपासादरम्यान आरोपीने इंटरनेट, गुगल आणि एआयच्या माध्यमातून विषारी पदार्थाबाबत माहिती शोधल्याचा संशय पोलिसांना आहे. तसेच या प्रकरणामागे आणखी कोणी सहभागी आहे का, किंवा हा मोठ्या कटाचा भाग होता का, याचाही तपास सुरू आहे.

मुंबई पोलिसांनी नागरिकांना कोणत्याही अनोळखी व्यक्तीकडून मिळणाऱ्या औषधांच्या गोळ्या किंवा कॅप्सूल स्वीकारू नयेत, असे आवाहन केले आहे. या प्रकरणातील सर्व बाबींची सखोल चौकशी सुरू असून फॉरेन्सिक अहवाल आणि तपासातून पुढील माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

# आरोग्य खात्याचा गलथान कारभार करतोय रुग्णांच्या जीवाशी खेळत; रुग्णवाहिका पडली धूळखात

## नादुरुस्त रुग्णवाहिका त्वरित दुरुस्त करून रुग्णसेवा 24 तास उपलब्ध न केल्यास ग्रामस्थांनी प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलनाचा इशारा

हिंदू प्रकाशवार्ता । अशोक पवार

**परभणी :** परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील इंदोरी प्राथमिक आरोग्य केंद्राचा ढिसाळ आणि भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत असलेल्या येलदरी परिसरातील १०८ क्रमांकाची मोफत रुग्णवाहिका गेल्या अनेक महिन्यांपासून किरकोळ बिघाडामुळे नादुरुस्त अवस्थेत धूळ खात पडली आहे. ऐनवेळी रुग्णांना, विशेषतः गरोदर मातांना हक्काची रुग्णवाहिका उपलब्ध होत नसल्यामुळे, नागरिकांना आपला जीव मुठीत धरून खाजगी वाहनांचा आणि ऑटोचा आधार घ्यावा लागत आहे. आरोग्य विभागाच्या या हलगर्जीपणामुळे परिसरातील जनतेमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सावळी गावातील एका गर्भवती महिलेला अचानक प्रसूती कळा सुरू झाल्याने तिच्या नातेवाईकांनी तातडीने आशा वर्कर कार्यकर्त्यांशी संपर्क साधला. आशा वर्करने तत्परता दाखवत १०८ रुग्णवाहिकेसाठी कंट्रोल रूमशी संपर्क केला असता, "सध्या वाहन उपलब्ध नाही" असे धक्कादायक आणि बेजबाबदार उत्तर देण्यात आले. धक्कादायक बाब म्हणजे, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आवारात १०८ रुग्णवाहिका उभी असतानाही ती नादुरुस्त असल्याने सेवेत नव्हती. शेवटी नाईलाजास्तव नातेवाईकांना महागडे भाडे देऊन खाजगी ऑटोचा सहारा घ्यावा लागला आणि त्या गरोदर महिलेला येलदरी आरोग्य केंद्रात दाखल करावे



लागले. सुदैवाने माता आणि बाळ सुखरूप असले, तरी वेळेवर रुग्णवाहिका न मिळाल्याने मोठा अनर्थ घडू शकला असता, अशी भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वरिष्ठ कार्यालयाकडे आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे वारंवार लेखी निवेदने देऊन आणि दूरध्वनीद्वारे कळवूनही या रुग्णवाहिकेच्या दुरुस्तीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. शासनाने सर्वसामान्य आणि गरीब रुग्णांसाठी करोडो रुपये खर्च करून ही मोफत सेवा सुरू केली आहे, मात्र स्थानिक अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे ग्रामीण भागातील गरीब कामगार आणि रुग्णांचे हाल बेहाल होत आहेत. ऐन आणीबाणीच्या प्रसंगी खाजगी वाहनचालक मागेल तेवढे अवाढव्य भाडे उकळतात, जे गरीब रुग्णांना परवडणारे नसते.

या गंभीर प्रकरणाची दखल घेत सावळी आणि येलदरी परिसरातील समस्त ग्रामस्थांनी परभणीच्या जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे तातडीने एकमुखी मागणी केली आहे. नादुरुस्त असलेली १०८ रुग्णवाहिका २४ तासांच्या आत दुरुस्त करून रुग्णसेवेसाठी पूर्ववत सुरू करावी, तसेच "वाहन उपलब्ध नाही" असे बेजबाबदार उत्तर देणाऱ्या संबंधित दोषी कर्मचाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी. गर्भवती महिलांच्या आणि ग्रामीण रुग्णांच्या जीवनाशी खेळणारा हा प्रकार आरोग्य विभागाने तात्काळ बंद करावा, अन्यथा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा येलदरी परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

# संपादकीय

## 146 वर्षांमधील सर्वात कोरडा जून आणि घोंगावते दुष्काळाचे सावट

केरळमध्ये मान्सूनचे आगमन वेळेवर झाले असले, तरी जून महिना संपत आला तरी पावसाने घेतलेली दडी आणि देशभरात निर्माण झालेली पावसाची तब्बल ४३ टक्के तूट अत्यंत चिंताजनक आहे. यंदाचा जून महिना गेल्या १४६ वर्षांमधील सर्वात कोरडा जून ठरल्याची धक्कादायक नोंद झाली आहे. मध्य भारतात ५९ टक्के, तर शेजारील गुजरातमध्ये तब्बल ८४ टक्के कमी पाऊस झाला आहे. महाराष्ट्रातही मान्सून खोळंबल्याने बळीराजाची पेरणीची कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. १५ जूननंतर मोसमी वाऱ्यांची वाटचाल अचानक थांबल्यामुळे देशातील बहुतांश भागांत कोरडे वातावरण आणि निरभ्र आकाश पाहायला मिळत आहे. मुंबई आणि पुण्यात सुरुवातीला काही दिवस हजेरी लावल्यानंतर पावसाने पुन्हा एकदा दडी मारली आहे, ज्यामुळे खरीप हंगामावर आणि देशाच्या जलसाठ्यांवर फार मोठे संकट ओढवले आहे. या भीषण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय कृषी मंत्रालयाने कमी पावसाचा फटका बसणाऱ्या जिल्ह्यांसाठी आपत्कालीन योजना तयार केल्याची माहिती केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली आहे. देशातील १११ जिल्हे, जिथे सिंचनाची व्याप्ती २५ टक्के किंवा त्याहून कमी आहे, त्यांना 'उच्च प्राधान्य' देऊन विशेष मदत देण्याची घोषणा करण्यात आली आहे. सरकारी पातळीवर अशा कागदी योजना तयार असल्या, तरी प्रत्यक्षात कोरड्या पडलेल्या विहिरी आणि धरणांमध्ये पाणी आणण्यासाठी या योजना किती प्रभावी ठरणार, हा मोठा प्रश्न आहे. देशाची अर्थव्यवस्था आणि कोट्यवधी शेतकऱ्यांचे जीवन पूर्णपणे मान्सूनवर अवलंबून असताना, अशा आपत्कालीन घोषणा केवळ तात्पुरती मलमपट्टी ठरतात, हीच आतापर्यंतची वस्तुस्थिती आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, यंदा सरासरीपेक्षा १० टक्के कमी पाऊस पडण्याचा अंदाज असून, देशावर दुष्काळाचे सावट गडद झाले आहे. त्यातच वर्षाच्या उत्तरार्धात 'एल निनो'चा प्रभाव अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. जर एल निनोची पकड मजबूत झाली, तर देशाच्या ४ ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसू शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे. पावसाच्या या लहरीपणामुळे मुंबई, ठाण्यासह महाराष्ट्रातील अनेक प्रमुख शहरांमध्ये आतापासूनच पाणी कपात आणि वापरावरील निर्बंध लागू करण्यात आले आहेत. जर पावसाने जुलै महिन्यातही अशीच ओढ दिली, तर केवळ शेतीच नव्हे, तर शहरांमधील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत उग्र रूप धारण करेल. हवामान विभागाने जुलैच्या सुरुवातीला पाऊस पुन्हा सक्रिय होईल आणि कोकण किनारपट्टीसह संपूर्ण देशात मान्सूनचा विस्तार होईल, असा दिलासादायक अंदाज वर्तवला असला, तरी केवळ निसर्गाच्या भरवशावर हात बांधून बसणे प्रशासनाला परवडणारे नाही. सरकारी अधिकाऱ्यांनी तातडीने जल व्यवस्थापन आणि जलसंधारणाच्या पायाभूत सुविधांची देखभाल करणे युद्धपातळीवर सुरू केले पाहिजे. केवळ आपत्कालीन योजनांचे गाजर न दाखवता, शेतकऱ्यांना बियाणे, खते आणि आर्थिक मदत वेळेत कशी मिळेल, याचे चोख नियोजन करणे गरजेचे आहे. दुष्काळाचे हे घोंगावते संकट वेळीच ओळखून प्रशासनाने आता कमालीची खबरदारी घेतली पाहिजे, अन्यथा देशासमोरील आर्थिक आणि अन्नसुरक्षेचे आव्हान नियंत्रणाबाहेर जाण्यास वेळ लागणार नाही.

## दिल्लीचा धडा विसरले छत्रपती संभाजीनगर?

पान 1 वरून ->

व्यावसायिक उपक्रम सुरू असून, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे शेकडो विद्यार्थी दररोज तासन्तास या तळघरांमध्ये बसत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

नियमांनुसार तळघराचा वापर पार्किंग किंवा स्टोअररूमसाठीच करण्याची परवानगी असते. मंजूर बांधकाम आराखडा, अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) आणि बांधकाम परवानगीतही तळघराचा वापर याच उद्देशासाठी नमूद केलेला असतो. मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या नियमांकडे दुर्लक्ष करून तळघरांचे व्यावसायिक वापरात रूपांतर करण्यात आले आहे.

एमपीएससी, यूपीएससी, बँकिंग, रेल्वे तसेच विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी सकाळपासून रात्रीपर्यंत या तळघरांमध्ये अभ्यास करत असतात. सध्या पावसाळा सुरू असल्याने या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

काही तळघरांमध्ये एकच प्रवेश आणि निर्गमन मार्ग आहे. अनेक ठिकाणी नैसर्गिक वायुवीजनाचा अभाव असून आपत्कालीन परिस्थितीत बाहेर पडण्यासाठी स्वतंत्र मार्ग उपलब्ध नाही. अग्निशमन यंत्रणा अपुरी असल्याचेही दिसून येते. पावसाचे पाणी शिरणे, शॉर्टसर्किट किंवा आग लागल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दिल्लीतील दुर्घटनेने अशाच निष्काळजीपणाची भीषण किंमत देशाने आधीच मोजली आहे.

इतकेच नव्हे, तर शहरातील काही तळघरांमध्ये नर्सरी शाळा, मेडिकल स्टोअर्स, कार्यालये तसेच काही खासगी रुग्णालयांचे विभागही सुरू असल्याचे चित्र आहे. यामुळे हा प्रश्न केवळ अभ्यासिकांपुरता मर्यादित राहत नाही, तर तो थेट सार्वजनिक सुरक्षेशी संबंधित ठरतो.

विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांकडून दरमहा एक हजार ते चौदाशे रुपये शुल्क आकारले जाते; मात्र त्याबदल्यात सुरक्षित वातावरणाची हमी दिली जात नाही. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पर्याय नसल्याने ते जीव धोक्यात घालून अशा तळघरांमध्ये अभ्यास करण्यास भाग पडत असल्याचे वास्तव आहे.

दिल्ली दुर्घटनेनंतर छत्रपती संभाजीनगरमध्येही काही दिवस तपासणी मोहीम राबविण्यात आली. नोटिसा बजावण्यात आल्या. मात्र त्यानंतरची कारवाई कितपत प्रभावी ठरली, हा प्रश्न आजही कायम आहे. नोटिसा मिळाल्यानंतर किती नियमबाह्य अभ्यासिका बंद झाल्या, किती तळघरांचा मूळ वापर पुन्हा पार्किंगसाठी करण्यात आला आणि किती जणांवर दंडात्मक कारवाई झाली, याची माहिती प्रशासनाने सार्वजनिक केलेली नाही.

प्रशासनाच्या नोंदीत पार्किंग आणि प्रत्यक्षात विद्यार्थ्यांनी भरलेली अभ्यासिका, हा केवळ नियमभंगाचा विषय नाही; तर तो विद्यार्थ्यांच्या जीवित सुरक्षेशी संबंधित गंभीर प्रश्न आहे.दिल्लीसारखी दुर्घटना घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा ती घडूच नये, यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे हीच प्रशासनाची खरी जबाबदारी आहे. महानगरपालिका, नगररचना विभाग, अग्निशमन विभाग आणि जिल्हा प्रशासनाने संयुक्त विशेष मोहीम राबवून शहरातील सर्व तळघरांची प्रत्यक्ष तपासणी करावी, मंजूर आराखड्याची पडताळणी करावी, नियमबाह्य वापर तातडीने बंद करावा आणि जीवितास धोका निर्माण करणाऱ्या आस्थापनांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकाकडून होत आहे.

# धागे तुटतात तेव्हा... आयुष्य शिकवतं!

जीवन हे एका सुई-दोऱ्याच्या नात्यासारखे असते. कधी धागे घट्ट विणले जातात, तर कधी अचानक तुटून जातात. पण प्रत्येक तुटलेला धागा हा केवळ वेदनेचा क्षण नसतो तर तो आयुष्याने दिलेला एक धडा असतो. "फाटकं असो वा तुटकं... नशीब सोडून सगळं काही शिवता येतं" हा साधा वाटणारा संदेश जीवनाच्या गाभ्याला स्पर्श करणारा आहे. आजच्या काळात माणूस सर्व काही मिळविण्याच्या स्पर्धेत इतका गुंतला आहे की, अपयश किंवा तुटलेले नाते स्वीकारण्याची त्याची क्षमता कमी होत चालली आहे. एक परीक्षा नापास झाली की आयुष्य संपल्यासारखे वाटते. एखादा व्यवसाय तोट्यात गेला की जगण्याचा अर्थ हरवतो. एखाद्या नात्यात फट पडली की स्वतःचे अस्तित्वच निरर्थक वाटू लागते. परंतु निसर्गाचा नियम वेगळा आहे. जे तुटते ते पुन्हा जोडता येते, जे हरवते ते पुन्हा कमावता येते, मात्र त्यासाठी धैर्य, संयम आणि प्रयत्नांची सुई हाती घ्यावी लागते.

एक शिंपी फाटलेले कपडे शिवतो. तो कपड्याला दोष देत बसत नाही. तो सुटलेले धागे शोधतो, सुईत दोरा ओवतो आणि पुन्हा त्याला आकार देतो. माणसाचे आयुष्यही असेच आहे. संकटे, अपयश, दुःख, विश्वासघात हे सर्व आयुष्याला फाडून टाकतात. पण प्रश्न असा आहे की, आपण त्याला शिवण्याचा प्रयत्न करतो का? की नशिबाला दोष देत बसतो? आज समाजात नशिबवाद मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसतो. "माझ्या नशिबातच नाही", "देवानेच असे लिहिले आहे", "माझे कर्मच वाईट आहे" अशा वाक्यांमुळे प्रयत्नांची शक्ती कमकुवत होते. प्रत्यक्षात इतिहासातील प्रत्येक परिवर्तन हे नशिबावर नव्हे तर जिद्दीवर घडले आहे. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जर नशिबावर विश्वास ठेवला असता, तर समाज परिवर्तनाचा इतिहास कधीच घडला नसता. त्यांनी परिस्थितीला दोष न देता परिस्थिती बदलण्याचे धाडस केले.

आजच्या तरुण पिढीसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे अपयश सहन करण्याची क्षमता कमी होणे. सोशल मीडियाच्या झगमगाटात प्रत्येकाला यशाचे प्रदर्शन दिसते, पण त्या यशामागील संघर्ष दिसत नाही. त्यामुळे स्वतःचे जीवन इतरांशी तुलना करताना अनेकजण नैराश्याच्या गर्तेत जातात. एखादा विद्यार्थी कमी गुण मिळाल्यामुळे खचतो, शेतकरी पीक नष्ट झाल्यामुळे निराश होतो, बेरोजगार युवक नोकरी न मिळाल्यामुळे स्वतःलाच दोष देतो. पण हे विसरले जाते की, तुटलेले धागे पुन्हा जोडण्यासाठी वेळ लागतो. जीवनात प्रत्येकाला काही ना काही गमवावे लागते. कोणाचे बालपण गरिबीत जाते, कोणाचे शिक्षण अर्धवट राहते, कोणाला नात्यांमध्ये फसवणूक सहन करावी लागते, तर कोणाला सामाजिक अन्यायाचा सामना करावा लागतो. पण या सर्व वेदना माणसाला अधिक सक्षम बनवू शकतात. कारण जखम जितकी खोल, तितकी शिकवण मोठी असते.




समाजातही हेच लागू पडते. एखाद्या समाजावर अन्याय झाला, त्याचे हक्क हिरावले गेले, त्याची प्रतिष्ठा तुडवली गेली, तरी तो समाज पुन्हा उभा राहू शकतो. मात्र त्यासाठी आत्मविश्वासाची सुई आणि एकतेचा दोरा आवश्यक असतो. विखुरलेल्या धाग्यांनी वस्त्र तयार होत नाही. तसेच विभागलेल्या समाजाने परिवर्तन घडत नाही. म्हणूनच संघर्षाच्या काळात एकजूट ही सर्वात मोठी ताकद ठरते. आज अनेक कुटुंबे तुटत आहेत. संवादाचा अभाव, अहंकार, आर्थिक स्पर्धा आणि भौतिक अपेक्षा यामुळे नात्यांचे धागे कमकुवत होत आहेत. नात्यांमध्ये आलेल्या छोट्या फटी वेळेवर शिवल्या गेल्या नाहीत तर त्या मोठ्या दरीत बदलतात. क्षमा, समजूतदारपणा आणि संवाद हे नात्यांना शिवणारे दोरे आहेत. जेव्हा हे दोरे तुटतात तेव्हा माणूस गर्दीत असूनही एकटा पडतो.

या चित्रातील सुई आणि दोरा केवळ शिवणकामाचे साधन नाहीत, तर ते जीवनाचे तत्त्वज्ञान आहेत. सुई टोचते, पण जोडते. संघर्षही तसाच असतो. तो वेदना देतो, पण आयुष्याला आकारही देतो. दोरा स्वतःला झिजवत जातो, पण फाटलेले कपडे एकत्र ठेवतो. समाजातील कार्यकर्ते, शिक्षक, लेखक, पत्रकार आणि संवेदनशील नागरिक यांची भूमिकाही अशीच असते. ते स्वतःच्या सुखाचा त्याग करून समाजातील तुटलेले धागे जोडण्याचा प्रयत्न करतात. आपल्या देशात आज द्वेष, जातीयता, धार्मिक ध्रुवीकरण, आर्थिक विषमता आणि सामाजिक तणाव वाढताना दिसत आहे.

या परिस्थितीत समाजाला तोडणाऱ्यांची संख्या वाढली आहे, पण जोडणाऱ्यांची गरज अधिक आहे. कारण तोडणे सोपे असते, जोडणे कठीण असते. एका क्षणात विश्वास तुटतो, पण तो पुन्हा निर्माण करण्यासाठी वर्षे लागतात. म्हणूनच प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे की, आपण आयुष्यात तुटलेल्या गोष्टींचा शोक करत बसणार आहोत की त्या पुन्हा शिवण्याचा प्रयत्न करणार आहोत? कारण नशिब आपल्या हातात नसते पण प्रयत्न, विचार, संघर्ष आणि कृती आपल्या हातात असतात. आणि अनेकदा हेच प्रयत्न नशिबालाही बदलून टाकतात. फाटलेले कपडे शिंपी शिवू शकतो. तुटलेले नाते प्रेम शिवू शकते. खचलेले मन आशा शिवू शकते. विखुरलेला समाज एकता शिवू शकते. पण त्यासाठी हातात सुई घ्यावी लागते, दोरा ओवावा लागतो आणि संयमाने काम करावे लागते.

आज माणूस नशिबाला दोष देण्यात इतका व्यस्त झाला आहे की, स्वतःच्या सामर्थ्याकडे पाहायलाच विसरला आहे. अपयश आले की नशिबाला दोष, अडचण आली की परिस्थितीला दोष आणि संघर्ष आला की काळालाच दोष दिला जातो. पण वास्तव हे आहे की, नशीब बदलण्याची ताकद प्रयत्नांमध्ये असते. इतिहासात ज्यांनी मोठी स्वप्ने पाहिली, अन्यायाविरुद्ध उभे राहिले आणि समाजाला दिशा दिली, त्यांनी नशिबावर नव्हे तर स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवला. आज गरज आहे ती तुटलेल्या मनांना जोडण्याची, विखुरलेल्या नात्यांना सांधण्याची आणि विभागल्या गेलेल्या समाजाला पुन्हा एकत्र आणण्याची. कारण तुटणे ही नैसर्गिक प्रक्रिया असू शकते, पण जोडणे ही माणुसकीची ओळख असते.

आजपासून नशिबाला दोष देणे थांबवा. आपल्या आयुष्यातील एखादा तुटलेला धागा शोधा. तो धागा एखाद्या नात्याचा असेल, स्वप्नाचा असेल, आत्मविश्वासाचा असेल, शिक्षणाचा असेल किंवा समाजाशी असलेल्या बांधिलकीचा असेल. त्याला पुन्हा जोडण्यासाठी पहिले पाऊल उचला. कारण तुटलेल्या गोष्टींवर रडणारे अनेक असतात, पण त्या पुन्हा उभ्या करणारेच इतिहास घडवतात. इतिहास नशिबावर विश्वास ठेवणाऱ्यांनी नाही, तर तुटलेल्या परिस्थितीला पुन्हा शिवणाऱ्यांनी घडवला आहे. लक्षात ठेवा, नशीब लिहिलेले असू शकते पण आयुष्याची शिवण आपल्या हातात असते!

**- प्रवीण बागडे नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

# शून्यासाठी बहुजनांचा संघर्ष : एक परखड वास्तव- डॉ.प्रदीप शिंदे

आज बहुजन समाज एका गंभीर राजकीय, सामाजिक आणि वैचारिक संभ्रमातून जात आहे. आरक्षणाच्या नावावर ओबीसी,एससी, एसटी आणि इतर वंचित घटक परस्परांशी संघर्ष करत आहेत; परंतु हा संघर्ष प्रत्यक्षात वाढत्या संधींसाठी नसून कमी होत चाललेल्या संधींच्या वाटणीसाठी आहे. खाजगीकरणामुळे सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्या आणि संस्थांचे प्रमाण सातत्याने घटत असताना, संविधानिक आरक्षणाची प्रभावी व्याप्तीही संकुचित होत चालली आहे.यामुळे एक विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे.संधी कमी होत आहेत,पण त्या कमी का होत आहेत यावर चर्चा करण्याऐवजी बहुजन समाज एकमेकांच्या वाट्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे.हीच या काळातील सर्वात मोठी वैचारिक शोकांतिका आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी "शिका, संघटित व्हा, संघर्ष करा" ही घोषणा दिली होती.या घोषणेचा गाभा हा वंचित समाजात जागृती, एकजूट आणि अन्यायाविरुद्ध सामूहिक प्रतिकार निर्माण करणे हा होता. परंतु आज परिस्थिती अशी आहे की "संघटित व्हा" या तत्त्वाऐवजी "विभाजित व्हा" ही मानसिकता अधिक प्रभावी होताना दिसते. संघर्ष व्यवस्थेविरुद्ध नसून वंचितांमध्येच सुरू आहे.आरक्षणाचा मूळ उद्देश केवळ नोकऱ्या वाटणे नव्हता. आरक्षण हे शतकानुशतके सामाजिक,शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित ठेवलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे साधन होते.त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे ते दीन-दलित,शोषित, वंचित समाजघटकांमध्ये ऐक्य निर्माण करण्याचे एक लोकशाही माध्यम होते. आरक्षणाचे तत्त्वज्ञान विभाजनाचे नव्हे तर प्रतिनिधित्वाचे आणि सामाजिक एकात्मतेचे आहे.परंतु मनुवादी सामाजिक रचनेची ऐतिहासिक पद्धत नेहमीच वंचितांना एकत्र येऊ न देण्याची राहिली आहे. "फोडा आणि राज्य करा" हे तिचे मूलभूत तंत्र आहे.आजही विविध बहुजन घटकांमध्ये संशय,अविश्वास आणि संघर्ष निर्माण करून त्यांची सामूहिक राजकीय शक्ती कमकुवत केली जात आहे. दुर्दैवाने,या जाळ्यात बहुजन समाजातील काही घटक अडकलेले दिसतात.व्यवस्थेविरुद्ध लढण्याऐवजी ते इतर वंचित घटकांनाच आपला प्रतिस्पर्धी मानू लागले आहेत.ही केवळ राजकीय चूक नाही,तर वैचारिक पराभवाची सुरुवात आहे.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या "States and Minorities" या ऐतिहासिक दस्तऐवजात राज्य समाजवादाची (State Socialism) संकल्पना मांडली होती. त्यांनी महत्त्वाच्या उद्योगधंद्यांवर, विमा क्षेत्रावर,शेतीच्या नियोजनावर आणि मूलभूत आर्थिक साधनांवर लोकशाही राज्याचे नियंत्रण असावे, अशी भूमिका घेतली होती. यामागील उद्देश स्पष्ट होता.आर्थिक शक्ती काही मोजक्या भांडवलदारांच्या हाती केंद्रित होऊ नये आणि समाजातील सर्व घटकांना समान संधी उपलब्ध व्हाव्यात.

आज मात्र सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण होत आहे, आर्थिक संसाधने काही मोजक्या कॉर्पोरेट गटांच्या हाती केंद्रित होत आहेत आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनेची व्याप्ती कमी होत चालली आहे.या प्रक्रियेला विरोध करण्याऐवजी जर बहुजन समाज आरक्षणाच्या उरलेल्या तुकड्यांवरच परस्परांशी संघर्ष करत राहिला,तर तो स्वतःच्या राजकीय आणि सामाजिक शक्तीचे क्षयीकरण करीत आहे.परखड सत्य असे आहे की,बहुजन समाज आज "शून्या"च्या वाटणीवर भांडत आहे.खाजगीकरणामुळे आरक्षणाच्या संधी शून्याकडे झुकत आहेत; पण त्या शून्याची निर्मिती करणाऱ्या आर्थिक आणि राजकीय धोरणांविरुद्ध व्यापक संघर्ष उभा राहताना दिसत नाही. उलट,शून्याचे वर्गीकरण करण्यातच ऊर्जा खर्च होत आहे.

मनुवादी आणि भांडवलशाही शक्तींसाठी ही आदर्श परिस्थिती आहे. कारण जेव्हा वंचित समाज परस्परांशी लढतो, तेव्हा व्यवस्थेला कोणतेही आव्हान निर्माण होत नाही. व्यवस्थेचा विजय तेव्हाच होतो, जेव्हा शोषितांचा संघर्ष शोषकांविरुद्ध न राहता शोषितांमध्येच सुरू होतो. म्हणूनच आजची खरी गरज आरक्षणातील वाट्यांच्या संघर्षापलीकडे जाण्याची आहे.खाजगी क्षेत्रात सामाजिक प्रतिनिधित्व,सार्वजनिक क्षेत्राचे संरक्षण,गुणवत्तापूर्ण शिक्षण, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक लोकशाही यासाठी संयुक्त बहुजन लढा उभारण्याची गरज आहे.बाबासाहेबांच्या "शिका, संघटित व्हा, संघर्ष करा" या मंत्राचा अर्थ आज नव्याने समजून घेण्याची आवश्यकता आहे.बहुजन आज शून्य होत चाललेल्या संधींच्या वाटणीवर भांडत आहेत, तर त्या संधी शून्य करणाऱ्या धोरणांविरुद्ध पुरेशा ताकदीने उभे राहत नाहीत. ज्यांनी आरक्षणाची व्याप्ती कमी केली, त्यांच्यावर प्रश्न विचारण्याऐवजी बहुजन एकमेकांवर संशय घेत आहेत; आणि हीच व्यवस्थेची सर्वात मोठी राजकीय यशस्विता आहे.शून्याचे वर्गीकरण करून कोणीही समृद्ध होत नाही. शून्य निर्माण करणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध सामूहिक संघर्ष केल्याशिवाय सामाजिक न्यायाचे स्वप्न पूर्ण होणार नाही.म्हणूनच आजची गरज आहे.ओबीसी विरुद्ध एससी, एसटी विरुद्ध ओबीसी, किंवा एका वंचित समूहाविरुद्ध दुसरा वंचित समूह असा संघर्ष नव्हे; तर सामाजिक न्याय, रोजगारनिर्मिती, सार्वजनिक क्षेत्राचे संरक्षण आणि खाजगी क्षेत्रातील प्रतिनिधित्वासाठी संयुक्त बहुजन संघर्ष. शून्यासाठी भांडणारे समाज इतिहास घडवत नाहीत; शून्य निर्माण करणाऱ्या व्यवस्थेला आव्हान देणारे समाज इतिहास बदलतात.

**— डॉ.प्रदीप शिंदे-**
**7385635505,सातारा.**

# महाकर्जमाफीच्या अंमलबजावणीला वेग

## जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून लाभार्थ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार

महाराष्ट्राची संपूर्ण अर्थव्यवस्था आणि संस्कृती ही कृषी क्षेत्राभोवती फिरते. परंतु, गेल्या काही वर्षांत निसर्गाचे चक्र पूर्णपणे बदलले आहे. कधी अवेळी येणारा पाऊस, कधी तीव्र दुष्काळ, तर कधी गारपीट, अतिवृष्टी आणि महापूर... एकामागून एक येणाऱ्या या नैसर्गिक संकटांमुळे राज्यातील बळिराजा पुरता कोलमडून गेला आहे. कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या या शेतकरी बांधवांना पुन्हा पायावर उभे करण्यासाठी राज्य शासनाने एक अत्यंत धाडसी आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. ते म्हणजेच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'.ही योजना केवळ एक तात्पुरती कर्जमुक्ती नसून, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना सन्मानाने जगण्याची आणि नव्या उमेदीने शेती करण्याची संधी देणारी 'नवसंजीवनी' ठरणार आहे.

महाकर्जमुक्तीची अंमलबजावणी अंतिम टप्प्यात

राज्य शासनाची आजवरची सर्वात मोठी महाकर्जमुक्ती योजना म्हणून या योजनेकडे पाहिले जात आहे. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. प्रशासकीय पातळीवर सर्व तयारी पूर्ण झाली असून, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या थेट कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे. या निर्णयामुळे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर लाखो शेतकरी कुटुंबांना खूप मोठा दिलासा मिळणार आहे.

*योजनेचे त्रिसूत्र कर्जमुक्ती एकवेळा समजोता आणि प्रोत्साहनपर लाभ*

**या योजनेचे स्वरूप केवळ कर्जमुक्ती नाही तर, विविध प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विचार करून याची अत्यंत अभ्यासपूर्ण आखणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने तीन घटकांचा समावेश आहे:**

**यात २ लाख रुपयांपर्यंत संपूर्ण कर्जमुक्ती:** जे शेतकरी थकबाकीदार आहेत, अशा पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा थेट लाभ दिला जात आहे. यापूर्वीच्या 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'चे लाभार्थी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठीही शासनाने यात विशेष व स्वतंत्र तरतूद केली आहे.

**एकवेळ समझोता योजना (OTS):** ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी 'वन टाईम सेटलमेंट' (OTS) म्हणजेच एकवेळ समझोता योजना लागू करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांनी आपल्या हिश्शाची रक्कम भरल्यानंतर, राज्य शासन कर्जमुक्ती रक्कम थेट शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करणार आहे.

**नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन:** अनेक शेतकरी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही बँकेच्या कर्जाची नियमित परतफेड करतात. अशा प्रामाणिक कर्जदार शेतकऱ्यांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होऊ नये, म्हणून शासनाने त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे.

डिजिटल तंत्रज्ञान आणि पारदर्शकता

कर्जमुक्तीयोजनेच्या अंमलबजावणी मध्ये तांत्रिक अडचणी आणि दिरंगाई होऊ नये यास राज्य शासनाने

' म हा आ य टी ' च्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवली आहे. सर्व बँकांकडून पात्र कर्जखात्यांचा तपशील थेट पोर्टलवर घेतला जात असून, संगणकीय पडताळणीद्वारे अंतिम याद्या तयार केल्या जात आहेत. या याद्या शेतकऱ्यांना सहज पाहता याव्यात यासाठी गाव चावडी, ग्रामपंचायत, बँक शाखा, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्र येथे प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर बँकांमार्फत संदेश पाठवूनही सूचित केले जाणार आहे.

शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आवाहन

'आधार प्रमाणिकर' अनिवार्य*

शेकऱ्यांनीयोजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन, पारदर्शक आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवण्यात आली आहे. पात्र शेकरनी यादीत नाव आल्यानंतर लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या आधार नंबर किंवा यादीतील विशिष्ठ नंबरसह 'आपले सरकार सेवा केंद्रात' किंवा बँकेत जाऊन आपल्या कर्जखात्याचे बायोमेट्रिक/ आधार प्रमाणीकरण करणे गरजेचे आहे. ही माहिती योग्य असल्याची खात्री करून शेतकऱ्यांनी मान्यता दिली, की शासनाकडून थेट कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल.आणि एकवेळ समझोता (OTS) योजनेतील लाभार्थ्यांनी प्रथम त्यांचा हिश्शाची रक्कम भरणे आवश्यक आहे, त्यानंतरच शासनाचा कर्जमुक्तीचा लाभ शेकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल.यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे.

*तक्रार निवारणासाठी सक्षम यंत्रणा*

योजनेच्या पारदर्शकतेवर शासनाने विशेष भर दिला आहे. कर्जखात्याच्या माहितीत किंवा बँक तपशीलात काही तांत्रिक त्रुटी असल्यास शेतकऱ्यांना दाद मागता यावी, म्हणून सक्षम तक्रार निवारण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. तसेच या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष समितीसुद्धा नियुक्त करण्यात आली आहे.

प्रशासकीय समन्वय

सहकार विभाग, जिल्हाधिकारी, बँका, महाआयटी, ग्रामपंचायती आणि स्थानिक प्रशासन या सर्व घटकांमध्ये राज्य शासनाने अचूक समन्वय साधला आहे. विविध स्तरांवर कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिल्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि गतिमान झाली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ च्या माध्यमातून राज्यातील लाखो शेतकरी पुन्हा एकदा 'कर्जमुक्त' होऊन 'कर्जपात्र' होणार आहेत. त्यांना नवीन पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू कर्जमुक्तीचा लाभ राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला एक नवी गती, नवी ऊर्जा आणि बळिराजाला सन्मानाने जगण्याचा नवा विश्वास देणारा ठरणार आहे.

**--काशीबाई थोरात-धायगुडे**
**वरिष्ठ सहायक संचालक मंत्रालय, मुंबई**

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## सहसंचालक डॉ. सुनीता गोल्हाईत यांच्या हस्ते राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेचा शुभारंभ



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ रविवारी जिल्हा रुग्णालय, चिकलठाणा येथे मा. सहसंचालक आरोग्य सेवा, मुंबई डॉ. सुनीता गोल्हाईत यांच्या हस्ते बालकाला पोलिओ लसीचे दोन थेंब पाजून करण्यात आला.

यावेळी डॉ. गोल्हाईत यांनी ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकापर्यंत पोलिओ लसीचे दोन थेंब पोहोचणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. कोणतेही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी आरोग्य विभागाने नियोजनबद्ध पद्धतीने मोहीम प्रभावीपणे राबवावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

कार्यक्रमाला सहायक संचालक डॉ. दयानंद मोतीपवळे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पद्मजा सराफ, जागतिक आरोग्य संघटना (WHO) चे सर्व्हेलन्स मेडिकल ऑफिसर डॉ. मुजीब सय्यद तसेच जिल्हा रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ लसीचे दोन थेंब देऊन पोलिओमुक्त भारत हे उद्दिष्ट अधिक बळकट करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# जिल्हाभर पल्स पोलिओ मोहिमेचा शुभारंभ

## जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बालकांना पोलिओ डोस

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ रविवारी विविध ठिकाणी उत्साहात पार पडला. जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या हस्ते वैजापूर तालुक्यातील महालगाव (प्राथमिक आरोग्य केंद्र गाढेपिंपळगाव) येथे, तर आरोग्य व शिक्षण समितीच्या सभापती अनिताताई मोठे यांच्या हस्ते सिल्लोड तालुक्यातील केरहाळा (प्राथमिक आरोग्य केंद्र अंधारी) येथे बालकांना पोलिओ डोस पाजून मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला.



प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे यांच्या हस्ते सिल्लोड तालुक्यातील पालोद व पानवडोद प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्येही मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी देविदास पालोदकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नासेर पठाण, सचिन काशीद, चंदन गणोरे, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी देविदास पालोदकर यांनी ० ते ५ वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओचा डोस देण्यासाठी पालकांनी लसीकरण केंद्रावर आणावे, असे आवाहन केले. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीचे पदाधिकारी, सदस्य, सभापती व उपसभापती यांनी लसीकरण बूथना भेटी देत मोहिमेचा आढावा घेतला आणि नागरिकांमध्ये जनजागृती केली.

डॉ. विशाल बेंद्रे यांनी सिल्लोड तालुक्यातील पालोद, पानवडोद, उंडणगाव, शिवना, धोत्रा तसेच खुलताबाद तालुक्यातील वेरूळ व गदाना येथील लसीकरण केंद्रांना भेट देऊन मोहिमेची पाहणी केली. त्यांनी वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन करत ० ते ५ वर्षांतील प्रत्येक बालकाला पोलिओचा डोस मिळावा, यासाठी पालकांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

मोहिमेच्या पर्यवेक्षणासाठी सहायक संचालक (कुष्ठरोग) डॉ. शिवकुमार हालकुडे (कन्नड), अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. छाया आवरगांवकर (वैजापूर), सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शैलेजा कुप्पास्वामी (गंगापूर), जिल्हा आयुष अधिकारी डॉ. शकील शेख (पैठण), जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वैशाली डकले (फुलंब्री), साथरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका लांडगे (खुलताबाद), जिल्हा प्रशिक्षण केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनंदा मदगे (छत्रपती संभाजीनगर) तसेच जिल्हा हिवताप अधिकारी रविंद्र ढोले (सोयगाव) यांनी विविध लसीकरण केंद्रांना भेटी देऊन मोहिमेचे पर्यवेक्षण केले.

यावेळी डॉ. जयश्री लहाणे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी विद्या सानप यांच्यासह जिल्हास्तरीय अधिकारी व पर्यवेक्षक उपस्थित होते.

## अजिंठा लेणीच्या पायथ्याशी पर्यटकांच्या बालकांना पोलिओ डोस



**फर्दापूर :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणी च्या पायथ्याशी पर्यटकांच्या बालकांना पोलिओ डोस देण्यात आला यावेळी आरोग्य विभाग चे अधिकारी कर्मचारी अमोल कवले, ए जी धमके, आशा सेवीका ज्योती कृष्णा मंगरुळे, सेवक वेदांत शिंदे यांनी जगप्रसिद्ध अजिंठा लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या बालकांना पोलिओ डोस देण्यात आला.

## शेतक-यांना खात्रीशीर लाभ देत पिकांच्या सुरक्षिततेसाठी तण नियंत्रण व्यवस्थापन अंमलात

**मुंबई :** देशात कृषी व अन्न क्षेत्रात अग्रगण्य कंपनी म्हणून नावाजलेल्या गोदरेज अग्रोव्हेट लिमिटेड कंपनीने कापूस उत्पादक शेतक-यांसाठी नवी घोषणा केली आहे. गोदरेज अग्रोव्हेट लिमिटेड कंपनीने कापूस उत्पादक शेतक-यांसाठी "हिटवीड मॅक्स' या निवडक तणनाशकावर खास कॅशबॅक ऑफर जाहीर केली आहे. कापूस पिकाच्या वाढीच्या सुरुवातीच्या टप्प्यातच शेतक-यांनी प्रभावी तणव्यवस्थापन करावे, हा यामागील उद्देश आहे. या योजनेंतर्गत हिटवीड मॅक्स खरेदी करणा-या शेतक-यांना खात्रीशीर कॅशबॅक बक्षीस स्वरुपात दिले जाईल. यामुळे शेतक-यांना थेट आर्थिक फायदा होईल. तसेच वैज्ञानिकदृष्ट्या शिफारस केलेल्या संरक्षण पद्धतींचा वापर करण्यास प्रोत्साहन मिळेल.

## सावंगी उपकेंद्रात राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम उत्साहात; बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** प्राथमिक आरोग्य केंद्र चौका अंतर्गत प्राथमिक आरोग्य उपकेंद्र सावंगी व परिसरातील अंगणवाडी केंद्रांमध्ये राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम रविवारी उत्साहात व यशस्वीरित्या राबविण्यात आली. शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून त्यांचे संरक्षण करण्यात आले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली.

या मोहिमेची पाहणी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी शिवाजी साळुंके यांनी सावंगी उपकेंद्राला भेट दिली. त्यांनी सुरू असलेल्या लसीकरण मोहिमेची माहिती घेत आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

यावेळी ग्रामपंचायत प्रशासक श्रीम जगदाळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋषी भूमकर, ग्रामपंचायत अधिकारी श्रीकांत पालवे, आरोग्य पर्यवेक्षक, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी तसेच लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलिओ लसीकरण मोहीम ; जिल्हा परिषद सदस्या कु. निकिताताई राजुबाबा काळे यांचा दौरा; शिवना सर्कल मधील आरोग्य केंद्रांना भेटी

**अजिंठा प्रतिनिधी :** बालकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि पोलिओमुक्त भारताचा संकल्प अधिक दृढ करण्यासाठी आज संपूर्ण देशात 'प्लस पोलिओ लसीकरण मोहीम' राबविण्यात येत आहे. याच मोहिमेचे गांभीर्य ओळखून आणि नेहमीप्रमाणेच जनतेच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देत, शिवना सर्कलच्या धडाडीच्या जिल्हा परिषद सदस्या कु. निकिता राजुबाबा काळे यांनी संपूर्ण सर्कलमध्ये झंझावाती दौरा केला.



निकिताताईंनी स्वतः शिवना, आमसरी, वाघेरा, नाटवी आणि खुपटा-मादणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांना व उपकेंद्रांना प्रत्यक्ष भेटी दिल्या.

**मोहिमेची प्रमुख वैशिष्ट्ये:**

**प्रत्यक्ष सहभाग:** निकिताताईंनी केवळ भेट दिली नाही, तर स्वतः उपस्थित राहून चिमुकल्यांना पोलिओचे 'दोन थेंब' पाजत मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवला.

**कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य वाढवले:** भर उन्हात आणि सुट्टीच्या दिवशीही सेवा देणाऱ्या डॉक्टर, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारत त्यांचा उत्साह द्विगुणित केला.

**पालकांशी संवाद:** केंद्रावर लहान मुलांना घेऊन आलेल्या माता-भगिनींशी संवाद साधून, एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

"लहान मुलांचे आरोग्य हीच आपली खरी संपत्ती आहे. शिवना सर्कल मधील एकही बालक या सुरक्षा कवचापासून वंचित राहू नये, यासाठी आमची संपूर्ण टीम ग्राउंडवर काम करत आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांचे कष्ट खरोखरच कौतुकास्पद आहेत."

कु. निकिता राजुबाबा काळे (सदस्या, जिल्हा परिषद)

चोख नियोजन, उत्तम प्रतिसाद!

राजुबाबा काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि निकिताताईंच्या थेट सहभागामुळे शिवना सर्कलच्या सर्वच केंद्रांवर आज पालकांचा आणि नागरिकांचा प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या चोख नियोजनाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## सावळदबारा येथे मन की बात' कार्यक्रम



**सावळदबारा प्रतिनिधी. :** मन_की_बात पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी साहेब यांच्या 'मन की बात' कार्यक्रम सावळदबारा येथे बघितला. यावेळी भारतीय जनता पार्टी सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते आदी होते कार्यक्रम झाल्यानंतर सर्वांना चहा.नाश्ताची व्यवस्था करण्यात आली होती. सावळदबारा येथील भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांच्या संपर्क कार्यालय सावळदबारा येथे मन की बात' कार्यक्रम बघितला.यावेळी ग्रामस्थ हजर होते. कार्यक्रम झाल्यानंतर चहा. नाश्ताची व्यवस्था करण्यात आली होती.

## तबला, गायन व हार्मोनियम प्रशिक्षणाला प्रतिसाद

नगर : आरोही संगीत विद्यालयाच्या वतीने तबला, हिंदुस्थानी शास्त्रीय गायन व हार्मोनियम प्रशिक्षण वर्ग नियमितपणे सुरू असून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. विद्यालयामध्ये लहान मुलांपासून प्रौढांपर्यंत सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांना संगीताचे शास्त्रोक्त प्रशिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांना अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळाच्या परीक्षांची तयारी, मंचावर सादरीकरणाचे प्रशिक्षण तसेच भजन, भावगीत, भक्तिगीत व शास्त्रीय संगीतासाठी विशेष मार्गदर्शन केले जाते. विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी गंधर्व परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून विद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे.

विद्यालयाचे संस्थापक स्वप्निल खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्ग सुरू असून शितल खराडे, महेश खोपटीकर यांचेही विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे. इच्छुक विद्यार्थी व पालकांनी प्रवेशासाठी आरोही संगीत विद्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शिवना प्राथमिक आरोग्य केंद्रात राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेचा शुभारंभ

**अजिंठा प्रतिनिधी :** देशाला पोलिओमुक्त ठेवण्याच्या राष्ट्रीय संकल्पाला अधिक बळ देण्यासाठी शिवना येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या महत्त्वपूर्ण मोहिमेचे उद्घाटन पंचायत समिती सदस्य शेख सलीम तसेच जिल्हा परिषद सदस्या निकिता ताई राजू बाबा काळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.



लहान मुलांच्या निरोगी व सुरक्षित भविष्यासाठी पल्स पोलिओ लसीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले. "पाच वर्षांखालील एकही बालक पोलिओच्या दोन थेंबांपासून वंचित राहू नये," असे आवाहन करत त्यांनी पालकांनी स्वतःहून पुढाकार घेऊन आपल्या पाल्यांना लसीकरण केंद्रावर आणावे, पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांनी असे सांगितले.

कार्यक्रमात प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पोलिओ निर्मूलन मोहिमेची माहिती देत, पोलिओ हा कायमस्वरूपी अपंगत्व आणणारा आजार असला तरी वेळेवर दिलेले लसीकरण त्यापासून प्रभावी संरक्षण देते, असे स्पष्ट केले. त्यामुळे प्रत्येक पालकाने या मोहिमेत सक्रिय सहभाग घेणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

या मोहिमेअंतर्गत गावातील तसेच परिसरातील पाच वर्षांखालील सर्व बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यात येणार असून आरोग्य विभागाने यासाठी विशेष नियोजन केले आहे. घराघरांत जाऊनही लसीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या प्रसंगी पंचायत समिती सदस्य शेख सलीम, जिल्हा परिषद सदस्य निकिता ताई राजू बाबा काळे,सरपंच व प्रशासक डॉ सलमान खान,ग्रामपंचायत सदस्य गणेश सपकाळ,शामराव होळकर,प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा सेविका संगीता दौड, अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी राष्ट्रीय आरोग्य अभियानाला यशस्वी करण्यासाठी पूर्ण सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

"प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब – निरोगी बालपण, सुरक्षित भविष्य" हा संदेश देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## पोलिओ लसीकरणला प्रतिसाद



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**अंधारी दि. २८जून:** देशातून पोलिओचे संपूर्ण उच्चाटन कायम राखण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेला अंधारी येथे नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गावातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र तसेच विविध लसीकरण बूथवर सकाळपासूनच पालकांनी आपल्या पाच वर्षांखालील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यासाठी मोठी गर्दी केली. या मोहिमेत एकूण ५०१ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यात आले. आरोग्य विभागाच्या डॉक्टर, परिचारिका, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका तसेच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे लसीकरण मोहीम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. गावातील प्रत्येक बालकापर्यंत पोलिओ लसीचा डोस पोहोचावा यासाठी घरोघरी जाऊन जनजागृती करण्यात आली. तसेच लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांचा शोध घेऊन त्यांनाही पोलिओचा डोस देण्यात आला. आरोग्य अधिकाऱ्यांनी सांगितले की, पोलिओ हा गंभीर आजार असून वेळेवर लसीकरण केल्यास त्यापासून प्रभावी संरक्षण मिळते. त्यामुळे प्रत्येक पालकाने आपल्या पाच वर्षांखालील मुलांना प्रत्येक पल्स पोलिओ मोहिमेत पोलिओ लसीचे दोन थेंब अवश्य पाजावेत, असे आवाहन करण्यात आले. या उपक्रमात ग्रामपंचायत पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था आणि ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदविला. नागरिकांनीही आरोग्य विभागाच्या या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यातही अशा मोहिमांना सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. आरोग्य विभागाने कोणतेही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी विशेष नियोजन केले असून, "प्रत्येक बालक सुरक्षित, पोलिओमुक्त भारत" हा संदेश यावेळी देण्यात आला.

## सातव्या पुण्यस्मरण दीनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



हिंदू प्रकाशवार्ता

**अंधारी :** कै. आसाराम गणपत तोडकर यांच्या सातव्या पुण्यस्मरणानिमित्त तोडकर परिवार व समस्त गावकरी मंडळ, अंधारी यांच्या वतीने सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल यांच्या सहकार्याने रविवारी (दि. २८ जून) श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात सर्व नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब (बीपी), मधुमेह (शुगर) तपासणी, ईसीजी सुविधा, आवश्यकतेनुसार पुढील उपचाराबाबत मार्गदर्शन तसेच मोफत औषधांचे वितरण करण्यात आले. वरिष्ठ हृदयरोगतज्ज्ञ डॉ. देवेंद्र बोरगावकर यांनी रुग्णांची तपासणी करून आरोग्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या मोफत आरोग्य तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तब्बल १८१ रुग्णांनी या शिबिराचा मोफत लाभ घेतला. विशेष म्हणजे, अवघ्या ६ महिन्याच्या बालकांपासून ते ९० वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील नागरिकांनी शिबिरात सहभाग नोंदवत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. विविध आजारांचे प्राथमिक निदान करून गरजेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णांना सल्ला देण्यात आला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी तोडकर परिवार, समस्त गावकरी मंडळ तसेच सेठ नंदलाल धूत हॉस्पिटलच्या वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर, परिचारिका व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थित नागरिकांनी अशा सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमाचे स्वागत करत आयोजकांचे कौतुक केले.

## राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते शुभारंभ

**परभणी :** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरणमोहिमे अंतर्गत जिंतूर तालुक्यातील कसर येथे रविवारी पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते मोहिमेचा शुभारंभ मोठ्या उत्साहात करण्यात आला.





लोकप्रतिनिधी आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी कर्मचारी विविध संस्थांचे पदाधिकारी आशा वर्कर स्वयंसेविका अंगणवाडी सेविका तसेच ग्रामस्थ गावकरी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शुभारंभ झाल्यानंतर पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी पाच वर्षाखालील बालकांना पोलिओ लसीचे दोन थेंब बांधून फुल मोहिमेचा औपचारिक सुरुवात केली यावेळी त्यांनी उपस्थित पालकांचे संवाद साधत एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये यासाठी प्रत्येक राजकीय पल्स पोलियोजने मोहिमेअंतर्गत जन्मापासून पाच वर्षापर्यंतच्या प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब देण्याचे उद्दिष्ट आरोग्य विभागाने पूर्ण करण्याचेनिश्चित केले आहे.

यासाठी जिल्हाभरात विशेष लसीकरण केंद्र उभारण्यात आली असून दुर्गम भागात ग्रामीण भागात कीर्ती पथके आशा स्वयंसेविका अंगणवाडी सेविका आणि आरोग्य कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

घराघरात जाऊन लसीकरणाची खात्री करण्यासाठी स्वातंत्र्य नियोजन ही करण्यात आले आहे. यावेळी आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी पालकांना लसीकरण बाबत मार्गदर्शन केले.

पोलिओ मुक्त भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक बालकाला प्रतिबंधक परिस्थितीचे दोन थेंब देणे आवश्यक असून याबाबत कोणत्याही प्रकारची गैरसमज बाळगूनये. व लसीकरण सुरक्षित प्रभावी आणि पूर्णपणे मोफत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली

या कार्यक्रमादरम्यान उपस्थित त्यांना "दोन थेंब पोलिओचे... प्रत्येक बालकांच्या सुरक्षित आणि निरोगी भविष्याचे!" हा संदेश देत जनजागृती केली या मोहिमेला ग्रामस्थांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला आणि परिसरातील सर्व बालकाचे लसीकरण पूर्ण करण्याचा निर्धार्य व्यक्त केला याचवेळी आरोग्य विभागाने पालकांना आवाहन केले की या आपल्या पाच वर्षाखालील प्रत्येक बालकाला राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेंतर्गत पोलिओ प्रतिबंध लस्सीचे दोन थेंब आवश्यक पाजावेत आणि पोलिओ मुक्त भारताच्या संकल्पनेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शंभर टक्के यशस्वी करावी

## ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी



**बिडकीन, प्रतिनिधी :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचालित ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूल येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या पर्यवेक्षिका वर्षा चव्हाण यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून व पुष्पपूजन करून करण्यात आली. यावेळी शाळेचे शिक्षक दत्तात्रय चेडे यांनी विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनकार्याची, सामाजिक न्यायासाठी केलेल्या कार्याची तसेच शिक्षण, समता आणि आरक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची सविस्तर माहिती दिली. शाळेतील विद्यार्थ्यांनीही राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर आधारित मनोगते व्यक्त करून त्यांचे विचार उपस्थितांसमोर मांडले. कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# घाटीतील अत्याधुनिक ट्रॉमा केअर सेंटरमुळे अपघातग्रस्तांना मोठा दिलासा – आ. प्रदीप जैस्वाल

## पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते ट्रॉमा केअर सेंटर व वॉर्ड क्र. 29 चे लोकार्पण

**छत्रपती संभाजीनगर** : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक ट्रॉमा केअर सेंटरमुळे अपघातग्रस्त व गंभीर रुग्णांना वेळेत आणि प्रभावी उपचार मिळून अनेकांचे प्राण वाचविण्यास मोठी मदत होणार असल्याचे प्रतिपादन शिवसेना आमदार तथा घाटी रुग्णालय अभ्यागत समितीचे अध्यक्ष प्रदीप जैस्वाल यांनी केले. राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते ट्रॉमा केअर सेंटर आणि श्रेणीवर्धित वॉर्ड क्रमांक २९ चे लोकार्पण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

आमदार जैस्वाल म्हणाले की, समृद्धी महामार्गासह जिल्ह्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्गांवर दररोज अपघात घडत असतात. अशा परिस्थितीत अत्याधुनिक ट्रॉमा केअर सेंटर ही काळाची गरज होती. या सुविधेमुळे अपघातग्रस्तांना तातडीने उपचार मिळतील. तसेच वॉर्ड क्रमांक २९ च्या श्रेणीवर्धनामुळे रुग्णांसाठी अधिक स्वच्छ, सुसज्ज आणि आधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या असून रुग्णसेवेचा दर्जाही उंचावला आहे. या लोकहितकारी उपक्रमासाठी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्यासह सर्व डॉक्टर, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे त्यांनी अभिनंदन केले.

पालकमंत्री संजय शिरसाठ म्हणाले की, घाटी रुग्णालय हे मराठवाड्यासह राज्यातील १६ जिल्ह्यांतील रुग्णांसाठी आरोग्याचे प्रमुख केंद्र बनले आहे. त्यामुळे जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून घाटीच्या विकासाला प्राधान्य दिले जाते. सर्वसामान्यांना दर्जेदार




आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू असलेल्या विकासकामांना सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे.

रुग्णालयातील उकाड्याचा प्रश्न उपस्थित करताना शिरसाठ म्हणाले की, अनेक पंखे सुरू ठेवूनही रुग्ण व डॉक्टरांना उष्णतेचा त्रास सहन करावा लागत असेल, तर रुग्णालय अधिकाधिक वातानुकूलित करण्याची आवश्यकता आहे. मोठ्या खासगी रुग्णालयांप्रमाणेच गरीब रुग्णांनाही चांगले वातावरण मिळाले पाहिजे. वातानुकूलित व्यवस्था केवळ आरामासाठी नसून संसर्गाचा धोका कमी करण्यासाठीही महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी पक्षाघात (पॅरालिसिस) झालेल्या रुग्णांवर तातडीने आणि मोफत उपचार करता यावेत यासाठी २५ कोटी रुपयांची अत्याधुनिक यंत्रसामग्री मंजूर झाल्याची माहिती दिली. पुढील १५ दिवसांत ही यंत्रणा घाटी रुग्णालयात दाखल होणार असून मुख्यमंत्री आणि आरोग्यमंत्र्यांच्या उपस्थितीत तिचे लोकार्पण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या कार्याचे कौतुक करताना शिरसाठ म्हणाले की, चांगले काम करणाऱ्यांना विरोध होणे स्वाभाविक असते. मात्र घाटीत झालेला सकारात्मक बदल सर्वसामान्यांना दिसून येत आहे. रुग्णालयातील अंतर्गत राजकारणावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, गेल्या अडीच वर्षांत डॉ. सुक्रे यांच्या बदलीचे प्रस्ताव वारंवार आले, मात्र जनहित लक्षात घेऊन ते थांबविण्यात आले. डॉक्टरांनी आपल्या कार्यातून असा विश्वास निर्माण करावा की, रुग्ण आणि जनता त्यांनाच या रुग्णालयात पाहण्याचा आग्रह धरतील.

कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, उपअधिष्ठाता डॉ. विनोद मुंदडा, डॉ. सुरेश हरबडे, डॉ. भारत सोनवणे, डॉ. गायत्री तडवळकर, डॉ. श्रीनिवास गडप्पा, डॉ. एम. बी. लिंगायत, डॉ. सरोजनी जाधव, डॉ. अविनाश लांब, डॉ. एम. एस. बेग, डॉ. प्रसाद देशपांडे, डॉ. प्रभा खैरे, डॉ. बजाज, डॉ. मीनाक्षी भट्टाचार्य, डॉ. दहिफळे, डॉ. शिल्पा असेगावकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुचिता जोशी, डॉ. वैशाली उणे-लोखंडे, डॉ. सोनाली देशपांडे, डॉ. सलमान शेख, प्रशासकीय अधिकारी दिलीप गोधणे, सुरक्षा अधिकारी सुरेश भाले, मेट्रन संजीवनी गायकवाड-गवळी, द्रौपदी कर्डिले, माजी महापौर त्र्यंबक तुपे, शिवसेना सचिव अॅड. अशोक पटवर्धन, नगरसेविका हर्षदा शिरसाट, नगरसेवक राजू राजपूत, दीपक पवार, अभ्यागत समिती सदस्य राजू अहिरे, सुनील कोळी यांच्यासह वरिष्ठ डॉक्टर, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मनसे विद्यार्थी सेनेचे आक्रमक आंदोलन; 23 महिन्यांच्या चिमुकल्याला मारहाण झाल्याने 'फर्स्ट क्राय प्री-स्कूल'ची केली तोडफोड!



हिंदू प्रकाशवार्ता | प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : शहरातील सिडको एन-१ भागातील 'फर्स्ट क्राय इंटेलिटॉट्स प्री-स्कूल'मध्ये शाळा प्रशासनाच्या अक्षम्य हलगर्जीपणामुळे एका २३ महिन्यांच्या चिमुकल्याला वर्गमित्राकडून मारहाण झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेचा जाब विचारण्यासाठी आज, २८ जून रोजी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या (मनविसे) पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी थेट शाळेत धडक देत आक्रमक आंदोलन केले. यावेळी संतप्त मनसैनिकांनी शाळेची जोरदार तोडफोड करत व्यवस्थापनाला चांगलाच इंगा दाखवला. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत झालेल्या या गंभीर निष्काळजीपणाचा निषेध करण्यासाठी मनसे विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सकाळीच आक्रमकपणे शाळेत पोहोचले. शाळा प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत संतप्त कार्यकर्त्यांनी थेट शाळेत घुसून तोडफोड केली. या अचानक झालेल्या आंदोलनामुळे परिसरात काही काळ प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेनंतर संबंधित दोषींवर

> **"लहान मुलांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. अशा बेजबाबदार शाळा व्यवस्थापनाविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे," असा इशारा मनसेच्या आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.**
>
> **रोहित ठेंगे मनसे पदाधिकारी**

कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची पोलीस आणि अधिकृत यंत्रणांकडून चौकशी सुरू असून, अधिकृत तपासानंतरच घटनेचे संपूर्ण सत्य स्पष्ट होईल. मात्र, मनसेच्या या आक्रमक पवित्र्यामुळे शाळा प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत.

सिडको एन-१ मधील फर्स्ट क्राय प्री-स्कूलमध्ये अवघ्या २३ महिन्यांच्या चिमुकल्यासोबत वर्गातच एक वाईट प्रसंग घडला. त्याच्या वर्गमित्राने त्याला मारहाण केली. लहान मुलांच्या सुरक्षेची जबाबदारी असणाऱ्या शाळा व्यवस्थापनाच्या ढिसाळ कारभारामुळे आणि हलगर्जीपणामुळेच हा प्रकार घडल्याचे समोर आले. ही माहिती मिळताच पालकांसह सर्वसामान्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली होती.

# सीएसआर उपक्रमातून पोटूळ अंगणवाडीचा झाला कायापालट; एच जी फाउंडेशन व संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीकडून बालकांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध

हिंदू प्रकाश वार्ता : प्रतिनिधी

**पोटूळ (ता. गंगापूर)** : एच जी फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलपमेंट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रमांतर्गत पोटूळ येथील अंगणवाडीचे नूतनीकरण करण्यात आले. आधुनिक सुविधांनी सुसज्ज झालेल्या या अंगणवाडीचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

या उपक्रमाअंतर्गत अंगणवाडीतील बालकांसाठी विविध खेळणी, खेळ साहित्याची गाडी, घसरगुंडी, खुर्च्या तसेच शैक्षणिक व बालविकासासाठी उपयुक्त साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. अंगणवाडीची संपूर्ण रंगरंगोटी करण्यात आली असून 'बाला पेंट'च्या माध्यमातून भिंतींवर आकर्षक, शैक्षणिक आणि बालमैत्रीपूर्ण चित्रे साकारण्यात आली आहेत. त्यामुळे अंगणवाडीचे रूप पालटले असून बालकांना आनंददायी व प्रेरणादायी वातावरणात शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे.




या उपक्रमासाठी एच जी इन्फ्रा लिमिटेडचे सुरक्षा अधिकारी वीरेंद्र सर आणि शुभम सर यांनी विशेष मार्गदर्शन व सहकार्य केले. तसेच संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीचे व्यवस्थापक हरीश लालकोट, प्रकल्प समन्वयक सचिन लिमकर तसेच सचिन डहाळे, इर्शाद सय्यद, प्रथमेश हिवाळे, वर्षा कापसे आणि देवयानी कापसे यांनी नियोजनापासून अंमलबजावणीपर्यंत मोलाचे योगदान दिले.

उद्घाटन कार्यक्रमाला शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लखन कापसे, सरपंच दादाभाऊ कापसे, प्रकाश कापसे, अरुण कापसे, गोपीनाथ घोडके, संजय कापसे, प्रशांत प्रकाळे, योगेश कापसे, बाळू दादा, दत्तू कापसे, पांडुरंग आव्हाड, निवृत्ती कापसे, विजय कापसे यांच्यासह अंगणवाडी सेविका, मदतनीस, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी एच जी फाउंडेशन, एच जी इन्फ्रा लिमिटेड आणि संवेदना डेव्हलपमेंट सोसायटी यांच्या ग्रामीण भागातील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. अशा सामाजिक उपक्रमांमुळे बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होत असून त्यांच्या शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

### घाटीत मनपा पॅटर्न; रस्ते स्वच्छतेसाठी अत्याधुनिक स्वीपिंग मशीनचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते लोकार्पण

# स्वच्छ, धूळमुक्त व आरोग्यदायी रुग्णालय परिसरासाठी महत्त्वाचे पाऊल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) प्रशासनाने 'स्वच्छ रुग्णालय म्हणजे सुरक्षित उपचार' या संकल्पनेला मूर्त स्वरूप देत रुग्णालय परिसरातील स्वच्छतेसाठी अत्याधुनिक स्वीपिंग मशीनची खरेदी केली आहे. महानगरपालिकेच्या धर्तीवर रस्ते व मोकळ्या जागांची यांत्रिक पद्धतीने स्वच्छता करण्यासाठी या मशीनचा वापर करण्यात येणार असून,



अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते मशीनचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी उपअधिष्ठाता डॉ. सुरेश हरबडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुचिता जोशी, विभागप्रमुख डॉ. एम. बी. लिंगायत, डॉ. अविनाश लांब यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या मशीनच्या साहाय्याने कमी वेळेत मोठा परिसर प्रभावीपणे स्वच्छ करता येणार असून, रुग्णालयातील अंतर्गत रस्ते आणि मोकळ्या जागांची नियमित साफसफाई यांत्रिक पद्धतीने केली जाणार आहे.

घाटी रुग्णालयात दररोज मराठवाड्यासह राज्यातील विविध भागांतून हजारो रुग्ण उपचारासाठी येतात. त्यांच्यासोबत मोठ्या संख्येने नातेवाईकही रुग्णालयात येत असल्याने परिसरावर मोठा ताण पडतो. अशा परिस्थितीत धूळ, कचरा आणि अस्वच्छता कमी करण्यासाठी ही आधुनिक स्वच्छता व्यवस्था उपयुक्त ठरणार आहे.

रुग्णालय परिसरातील धूळ कमी झाल्यामुळे श्वसनाचे आजार, अॅलर्जी आणि संसर्गाचा धोका कमी होण्यास मदत होईल. स्वच्छ व आरोग्यदायी वातावरणामुळे रुग्णांना उपचारादरम्यान अधिक सकारात्मक अनुभव मिळेल, तसेच डॉक्टर, परिचारिका आणि इतर कर्मचाऱ्यांनाही अधिक स्वच्छ परिसरात सेवा देणे शक्य होणार आहे. रुग्णहित आणि स्वच्छतेच्या दृष्टीने घाटी प्रशासनाने उचललेले हे पाऊल महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

# बंधूभाव जागविणारे साहित्य निर्माण होण्याची गरज : प्रा. डॉ. सर्जेराव ठोंबरे

**छत्रपती संभाजीनगर** : मराठवाड्याच्या सांस्कृतिक व साहित्यिक वैभवात मोलाची भर घालत, समाजात सध्या पसरलेले वैचारिक अविश्वासाचे वातावरण दूर करण्याची आणि बंधुभाव जागवणारे दर्जेदार साहित्य निर्माण करण्याची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेचा प्रतिष्ठित 'गणेश सरस्वती ठाकूर देसाई विशेष ग्रंथकार पुरस्कार' मिळाल्याबद्दल 'डॉक्टर नावाचा माणूस' या पुस्तकाचे लेखक प्रा. डॉ. उपेंद्र कुलकर्णी आणि डॉ. रमेश रावळकर यांचा 'साहित्य भारती'च्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. गोविंदभाई श्रॉफ कला अकादमीत पार पडलेल्या या शानदार सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. ठोंबरे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर साहित्य भारतीचे प्रांताध्यक्ष प्रा. डॉ. सर्जेराव जिगे, कार्याध्यक्ष उमेश काळे, जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. महेश खरात, प्रमुख वक्ते दत्ता जोशी, डॉ. आदित्य कुलकर्णी आणि ज्येष्ठ चिकित्सक डॉ. एन. डी. कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

ज्यांच्या अथांग जीवनप्रवासावर आणि निस्पृह वैद्यकीय सेवेवर हे पुस्तक आधारित आहे, त्या ज्येष्ठ डॉक्टर एन. डी. कुलकर्णी यांनीही आपल्या मनोगतातून कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष डॉ. महेश खरात यांनी केले, तर संपूर्ण सोहळ्याचे नेटके आणि बहारदार सूत्रसंचालन दिपाली कुलकर्णी यांनी केले. शेवटी उपस्थित मान्यवरांचे आणि रसिकांचे आभार डॉ. संतोष देशमुख यांनी मानले. हा गरिमापूर्ण सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रा. मनोहर बन्सवाल, प्रा. डॉ. संजय सांभाळकर, शेषराव पठाडे, डॉ. निलेश देगावकर आणि सारिका कुलकर्णी यांच्यासह साहित्य भारतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नाजिया इलाही खान यांच्यावर कारवाईच्या मागणीसाठी आज आंदोलन विभागीय आयुक्त कार्यालयासमोर; ऑल इंडिया उलेमा बोर्ड वक्फ विंगचा पाठिंबा

**छत्रपती संभाजीनगर** : सोशल मीडियावर इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मुहम्मद (स.अ.व.) तसेच उम्मुल मोमिनीन हजरत आयेशा (र.अ.) यांच्याविषयी आक्षेपार्ह व अपमानास्पद वक्तव्य केल्याचा आरोप असलेल्या नाजिया इलाही खान यांच्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी सोमवार, दि. २९ जून रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या आंदोलनाला ऑल इंडिया उलेमा बोर्ड वक्फ विंग, महाराष्ट्र यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे.



ऑल इंडिया उलेमा बोर्ड वक्फ विंग महाराष्ट्रचे अध्यक्ष शेख आसिफ महेबूब यांनी सांगितले की, कोणत्याही धर्माच्या श्रद्धास्थानांबाबत किंवा पूजनीय व्यक्तींबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणे हे समाजातील सलोखा आणि परस्पर सौहार्दाला बाधा पोहोचवणारे आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून नाजिया इलाही खान यांच्याविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी ऑल इंडिया उलेमा बोर्ड वक्फ विंगचे शहराध्यक्ष अशरफ पठाण यांनीही आंदोलनाला पूर्ण पाठिंबा जाहीर करत, शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने होणाऱ्या या आंदोलनात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. हे आंदोलन अटल समाज संघर्ष कृती समिती यांच्या वतीने आयोजित करण्यात आले असून, दुपारी २ ते ५ या वेळेत विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडणार आहे. विविध सामाजिक, धार्मिक व नागरिक संघटनांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला असून, नाजिया इलाही खान यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी आंदोलनातून करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या प्रसंगी ऑल इंडिया उलेमा बोर्ड वक्फ विंगचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार असून, समाजातील शांतता, परस्पर आदर आणि धार्मिक सौहार्द कायम राखण्यासाठी कायद्याचे कठोर पालन व्हावे, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.

# शहराचे नागरिकच वारसास्थळांचे खरे 'ब्रँड अॅम्बेसेडर' : डॉ. संजय पाईकराव

## 'शहरनामा'च्या हेरिटेज वॉकमध्ये औरंगाबाद लेणीतील 'अवलोकितेश्वर' शिल्पाच्या वैशिष्ट्यांचा उलगडा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : शहरातील औरंगाबाद लेणी हा जागतिक दर्जाचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा असून, त्याची माहिती प्रत्येक नागरिकाने अभिमानाने जपली पाहिजे. शहरातील नागरिक आणि लहान मुले हीच वारसास्थळांची खरी 'ब्रँड अॅम्बेसेडर' आहेत. आपल्या वारशाची माहिती इतरांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारली पाहिजे, असे प्रतिपादन मूर्ती व शिल्प संशोधन संस्थेचे सचिव डॉ. संजय पाईकराव यांनी केले.

'शहरनामा'च्या वतीने रविवारी आयोजित दुसऱ्या हेरिटेज वॉक आणि फोटो वॉकमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाजवळील औरंगाबाद लेणी समूहातील क्रमांक ६ ते १० या लेण्यांना भेट देण्यात आली. इतिहास व पुरातत्त्व विभाग (एमजीएम विद्यापीठ), आख्यान फाऊंडेशन, गरवारे




> **'अवलोकितेश्वर' शिल्प भारतातील सर्वोत्तम**
>
> **"औरंगाबाद लेणीतील 'अवलोकितेश्वर' शिल्प हे संपूर्ण भारतातील सर्वोत्तम शिल्प मानले जाते. एवढा समृद्ध वारसा जवळ असूनही या लेणीची अपेक्षित प्रसिद्धी झालेली नाही. परदेशातील संशोधक या लेणीवर अभ्यास करतात. त्यामुळे येथे येणाऱ्या प्रत्येकाने वारसास्थळाची स्वच्छता, शिस्त आणि संवर्धनाची जबाबदारी जपली पाहिजे," असे आवाहन डॉ. संजय पाईकराव यांनी केले.**

कम्युनिटी सेंटर, रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर ईस्ट, अॅडगाइड मीडिया प्रा. लि. आणि भारत पर्यटन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम झाला.

यावेळी गरवारे कम्युनिटी सेंटरचे संचालक सुनील सुतवणे, एमजीएम विद्यापीठाच्या इतिहास व पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक प्राध्यापक आशुतोष पाटील, अॅडगाइड मीडियाचे ओम परदेशी, रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर ईस्टचे अध्यक्ष निवृत्ती गजभारे तसेच भारत पर्यटन विभागाच्या वरिष्ठ अधिकारी स्नेहल पाटील उपस्थित होत्या.

मार्गदर्शन करताना डॉ. पाईकराव यांनी औरंगाबाद लेणीचा इतिहास, कला, स्थापत्य आणि पुरातत्त्वीय वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला. वारसास्थळे समजून घेण्यासाठी त्यांच्याविषयी प्रेम आणि जिज्ञासा असणे आवश्यक आहे. कलासक्त नजरेने पाहिल्यास येथील शिल्पे जणू बोलू लागतात, असे त्यांनी सांगितले.

औरंगाबाद लेणीचा उल्लेख कान्हेरी लेणीतील शिलालेखांमध्ये आढळतो. सहाव्या ते आठव्या शतकादरम्यान घडविलेल्या या बेसॉल्टमधील शिल्पांवरील आभूषणे, केशरचना आणि कोरीव काम अत्यंत आकर्षक असून, येथील काही शिल्पे अजिंठ्यापेक्षाही सरस असल्याचे अभ्यासक मानतात, असे त्यांनी नमूद केले.

लेणी क्रमांक सातमधील 'अवलोकितेश्वर बोधिसत्त्व' हे शिल्प भारतातील सर्वोत्कृष्ट शिल्पांपैकी एक मानले जाते. 'अष्टभयां'पासून संरक्षण करणाऱ्या अवलोकितेश्वराची ही प्रतिमा अजिंठा, कान्हेरी आणि वेरूळ येथील शिल्पांपेक्षाही अधिक प्रभावी मानली जाते. याच लेणीतील 'राजनर्तिका नृत्यशिल्पपट' स्त्री स्वातंत्र्याची प्रभावी अभिव्यक्ती करणारी अप्रतिम कलाकृती असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच लेणी क्रमांक सहाचा शोध डॉ. रमेश गुप्ते यांनी १९६० च्या दशकात लावला असून, ती 'गणपती लेणी' म्हणून ओळखली जाते, अशी माहितीही त्यांनी दिली.

यावेळी 'शहरनामा'च्या पहिल्या फोटो वॉकच्या विजेत्या मिनल निकम यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच सुधीर कोर्टीकर यांनी विविध पक्ष्यांचे आवाज सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▮ संपादक : रोहित विकास पाटील ▮ email : hinduprakashvarta@gmail.com ▮ epaper.hinduprakashwarta.com ▮ PRGI No.: MHMAR/25/A2358 ▮ संपर्क क्र. : 7261999911